# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०७/०१/२०२५ अनु.क्र. ०५

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **" सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**
-

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/आंजिब हजर पो.अ.चंद्रपुर/१२० /२०२५ अमरावती शहर दिनांक ०३/०१/२०२५**

**संदर्भ :-** (१) या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/आंजिब-स्विकृती/८७१५/२०२४, दि.०३.१०.२०२४

(२) पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे आदेश आस्था-१//आंजिब/पो.अम./कार्यमुक्त/ पो.अंमलदार/४८६६/२०२४ दि.३१/१२/२०२४

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे संदर्भीय क्र. १ अन्वये आंतरजिल्हा बदली अंतर्गत विनंतीवरुन पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे स्विकृती देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पोलीस अधिक्षक,परभणीयांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना बदलीवर हजर होण्यास दिनांक ३१/१२/२०२४ चे मा.नंतर कार्यमुक्त करण्यात आले असल्याने सदर महिला पोलीस शिपाई बदलीवर हजर होण्यास आल्याने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पोलीस शिपाई पदावर या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येत असुन त्यांची नेमणुक त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदाराचे पदनाम/ ब.क्र. व संपुर्ण नाव | मुळ घटक | कार्यमुक्त केल्याचा दिनांक | या घटकात हजर झाल्याचा दिनांक | स्विकृतीचे पद व प्रवर्ग | देण्यात आलेला नविन ब.क्र. | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि/१५७३ राहुल राधेश्याम यादर | पोलीस अधिक्षक चंद्रपुर | ३१/१२/२०२४ मा.नंतर | ०१/०१/२०२५ मा.पुर्व | पोलीस शिपाई खुला | **१४२२** | **पोलीस मुख्यालय अमरावती शहर** |

वर नमुद महिला पोलीस अंमलदार हे आंतरजिल्हा बदली अंतर्गत बदलुन आल्याने त्यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. संकिर्ण १०१७/३८४३/प्र.क्र. ४६९/पोल-५ दिनांक २६.१०.२०१७ मधील तरतुदीनुसार वरील पोलीस शिपाई यांची सेवा जेष्ठता त्याच्या भरती वर्षात

अमरावती शहर आस्थापनेवर सेवाजेष्ठतेने सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित करण्यात येईल.

वर नमुद महिला पोलीस शिपाई यांनी प्रथम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आमद देवुन तेथे शासकिय संरजाम घ्यावा व नंतर नेमणुकीच्या ठिकाणी हजर व्हावेत.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोना-१३५६ आदमने/१०५०१/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/१२/२०२४**

### आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार त्यांचे नवासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमुण दिलेल्या कर्तव्यावरुन वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले असल्याने कसुरी अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला आहे. तरी कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहिले असुन तुम्ही तुमच्या कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असल्याने तुम्ही कर्तव्यावर गैरहजर राहुन कसुर केलेला आहे. त्यामुळे तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | पोना/१३५६ सारंग आदमने | पोलीस मुख्यालय अम.शहर | दि. १०/०९/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता मध्यवर्ती कारागृह येथील बंदी यांना इलाजाकरीता जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे घेवुन जाणे व जेल दाखल करणे कामी कर्तव्य लावले असता वरिष्ठांना पुर्व सुचना न देता गैरहजर राहिले. दि.१०/०९/२०२४ रोजी ११.३५ वाजता कर्तव्यावर हजर. | दि.१०.०९.२०२४ चे ०९.५५ वा. ते ११.३५ वा.पर्यत एकुण ०१ तास ४० मिनीट कर्तव्यावर गैरहजर. |

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोहवा-१०४४ चव्हाण/१०८०१/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/परि-२/पोहवा-१०४४/कसुरी अहवाल/९३२/२०२४, दिनांक २०/०७/२०२४

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ का.दा.नो./पोहवा-१०४४ चव्हाण/७७३३/२०२४, दिनांक २७/०८/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोहवा/१०४४ रमण चव्हाण, नेमणुक पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोहवा/१०४४ रमण चव्हाण, पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही गोपाल नगर व एम.आय.डी.सी. बिट चे काम पाहत असुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे.राजापेठ यांचे आदेशाने तुम्ही त्या बिटचे काम पाहता त्या बिट क्षेत्रातील पो.स्टे.राजापेठ येथे दाखल गुन्हे तपासकामी देण्यात येतात. परंतु तुम्हाला तुमच्या बिट मधील पो.स्टे.राजापेठ येथे दाखल गुन्हे दिनांक १८/०६/२०२४ रोजी बारनिशी मपोशि/१८९६ आरती यांनी (१) अप क्र. ३११/२०२४ कलम २९४, ५०६ (ब) भादवि, (२) अप क्र.३९२/२०२४ कलम ११७(२), ३५२, ३५१(२) बी.एन.एस. दाखल गुन्हयांची केस डायरी पुढील तपासाकरीता तुमच्या कडे बारनिशी घेवुन आले असता तुम्ही सदर गुन्हयांची तपासडायरी घेण्यास नकार दिला. याबाबत नमुद बारनिशी यांचे कडुन स्टे.डा.साना क्र. ५२/२०२४ चे १९.३० वा. नोंद घेण्यास आली आहे. तुम्ही डायरी घेण्यास नकार दिला असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे.राजापेठ यांनी त्यांचे चेंबर मध्ये तुम्हाला प्रत्यक्ष बोलावुन विचारणा केली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना सुध्दा तुम्ही डायरी घेत नाही अशी अरेरावीची भाषा बोलुन तपास डाय-या उध्दटपणाने टेबलावर टाकुन कक्षातुन निघुन गेले.तसेच तुम्ही गुन्हयांची डायरी का घेतली नाही म्हणुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.स्टे.राजापेठ यांनी दिनांक २०/०६/२०२४ रोजी खुलासा सादर करणेबाबत लेखी पत्र देवुन तुम्हाला खुलासा सादर करणेबाबत सांगितले असता. तुम्ही खुलासाचे पत्र घेण्यास नकार दिला असुन खुलासाचे पत्र सुध्दा घेतले नाही. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले असुन वरिष्ठ अधिकारी यांनी तुम्हाला दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष केले आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन तुम्ही तुमचे कर्तव्यात निष्काळजीपणा/बेजबाबदारपणा केला असुन गुन्हे प्रलंबित ठेवुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले असुन तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी समक्ष बोलावले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले असुन आमचे समक्ष तुमचे मौखीक म्हणणे मांडले असुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर-कालावधी/पोशि-५१८ राजिक + ३/१०९६४/२०२४**
**अमरावती शहर दिनांक १८/१२/२०२४**

**संदर्भ :-** या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/ का.दा.नो./पोशि-५१८ राजिक+ ३/६९३५/२०२४, दिनांक ०१/०८/२०२४

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असल्याने वरील संदर्भीय क्रमांक ०१ अन्वये गैरहजर कालावधी हा असाधारण (विनावेतन) का करण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. अ. क्र. ०१ व ०२ यांनी स्पष्टीकरण सादर केलेले असुन सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टीकरण संयुक्तीक नसल्याने सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पो.अधि.अंम. यांचे नाव, हुद्दा व ब.नं. | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/५१८ अब्दुल राजिक | पो.मुख्या. अम.शहर | दि.२६/०५/२०२४ चे सकाळी ०६.०० वा.पी.टी.परेड करीता गैरहजर राहिले. दिनांक २९/०५/२०२४ चे ११.३० वा. हजर झाले. | दि.२६/०५/२०२४ तसेच दि.२९/०५/२०२४ पर्यत एकुण ०४ दिवस गैरहजर राहिले. | **एकुण ०४ दिवस असाधारण रजा** |
| २ | पोशि/३४१ सागर इंगळे | पो.मुख्या. अम.शहर | दि. ०५/०६/२०२४ रोजी गैरहजर राहिले. | दि.०५/०६/२०२४ पर्यत एकुण ०१ दिवस गैरहजर राहिले. | **एकुण ०१ दिवस असाधारण रजा** |
| ३ | पोना/१४०१ विजय धुर्वे | पो.मुख्या. अम.शहर (सध्या पो.स्टे. राजापेठ) | दि. ०१/०६/२०२४ रोजी सुपर स्पेशालिस्ट हॉस्पीटल, अम. येथे जेल कैदी रुग्ण यांची सुरक्षा गार्ड कर्तव्य नेमले असात गैरहजर राहिले. दि. ०७/०६/२०२४ चे ११.५५ वा. हजर झाले. | दि.०१/०६/२०२४ ते दि.०७/०६/२०२४ पर्यत एकुण ०७ दिवस गैरहजर राहिले. | **एकुण ०७ दिवस असाधारण रजा** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | पोना/७७८ सुरेश प्रधान | पो.मुख्या. अम.शहर | दि. २८/०४/२०२४ चे २०.०० वा. माळटेकडी पिकेट कर्तव्यावरुन गैरहजर राहिले. दि. ०७/०५/२०२४ रोजी हजर झाले. | दि.२८/०४/२०२४ ते दि.०७/०५/२०२४ पर्यत एकुण १० दिवस गैरहजर | **एकुण १० दिवस असाधारण रजा** |

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### संकीर्ण

**१.पोआअ/लेखा/पोकनि/जलतरण-सायकलींग/१४६/२०२५ अमरावती शहर दिनांक ०६/०१/२०२५**

### आदेश

**संदर्भ -** राखीव पोलीस निरीक्षक , पो.मुख्यालय, अमरावती शहर यांचे पत्र क्र.२३८३/२०२४ दि.२४/०७/२०२४

**विषय -** दि.२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिना निमित्ताने पोलीस जलतरण केंद्र येथे पाण्याचेआत (Under Water) सायकल चालवुन तिरंगा झेंडा फडकविण्याचे प्रात्यक्षिक करणे बाबत.

### आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहरचे आस्थापनेवरील पोहवा/२६८ प्रविण दादाराव आखरे नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना दि.२६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिना निमित्ताने पोलीस जलरतरण केंद्र येथे पाण्यात आंत (Under Water) सायकल चालवुन तिरंगा झेंडा फडकविण्यात प्रात्यक्षिक करण्याची परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१. स्वखर्चाने व स्वताचे जबाबदारीवर स्वतचे सुरक्षेतेची काळजी घेवुन करावे.
२. त्यासाठी अधिकृत रजा मंजुर करुन घ्यावी.
३. जिवितास कोणतेही नुकसान झाल्यास त्यास हे कार्यालय व शासन जबाबदार राहणार नाही.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस